# हवामान आधारित कृषि सल्ला

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, जिल्हा कृषि हवामान केंद्र, कृषि विज्ञान केंद्र , मोहोळ , सोलापूर.

दूरध्वनी –(०२१८९) २३३००१ ईमेल-damu.kvkmohol@gmail.com

### (२८०) हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दिनांक ०३/०२/२०२३

| मागील आठवडयातील हवामान (दि २८.०१.२०२३ ते ०३.०२.२०२३) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (दि.०४.०२.२०२३ ते ०८.०२.२०२३) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २८ | २९ | ३० | ३१ | ०१ | ०२ | ०३ | दिनांक | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी.) | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० |
| ३३.८ | ३४.४ | ३३.६ | ३३.० | ३२.६ | ३१.८ | ३१.४ | कमाल तापमान (अं. से.) | ३३.० | ३४.० | ३४.० | ३४.० | ३५.० |
| - | १८.३ | १७.४ | १९.६ | २०.५ | १७.४ | १३.४ | किमान तापमान (अं. से.) | १६.० | १६.० | १७.० | १८.० | १७.० |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | निरभ्र | निरभ्र | ढग स्थिति (आकाश ) | अंशतः ढगाळ | निरभ्र | निरभ्र | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ |
| - | ६३ | ७३ | ७२ | ६९ | ७२ | ७१ | सकाळची सापेक्ष आद्रता (%) | ६२ | ६१ | ६३ | ६५ | ६६ |
| २३ | २० | २९ | ४१ | ४२ | ४१ | - | दुपारची सापेक्ष आद्रता (%) | ४२ | ३९ | ४० | ३९ | ४० |
| १.९ | ५.६ | ३.७ | ०.० | ३.७ | ०.० | ४.७ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १२.३ | ११.२ | १०.९ | ११.१ | ९.४ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | **भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचे कडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार सोलापूर जिल्ह्यामध्ये दिनांक ०४, ०७, ०८ फेब्रुवारी २०२३ रोजी आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. तर दिनांक ०५ फेब्रुवारी व ०६ फेब्रुवारी २०२३ रोजी आकाश मुख्यता निरभ्र राहण्याची शक्यता आहे. दिनांक ०४ फेब्रुवारी ते ०८ फेब्रुवारी २०२३ दरम्यान हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे.** कमाल तापमान ३३ अंश सेल्सिअस ते ३५ अंश सेल्सिअस पर्यंत तर किमान तापमान १६ ते १८ अंश सेल्सिअस पर्यंत राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ६१ ते ६६ % तर दुपारची सापेक्ष आद्रता ३९ ते ४२ % दरम्यान राहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी ९.४ किमी ते १२.३ किमी पर्यन्त राहण्याची शक्यता आहे. |
| **विस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस)** | | विस्तारीत अंदाजानुसार(ईआरएफएस)मध्य महाराष्ट्रात विभागात (सोलापूर,धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर)<br>**दिनांक ०९ फेब्रुवारी ते १४ फेब्रुवारी २०२३ दरम्यान**<br>कमाल तापमान सरासरी राहण्याची शक्यता आहे.<br>किमान तापमान सरासरी राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | ➢ शेतकरी बांधवांनी आपल्या पिकाचे कीड व रोगा संदर्भात नियमित सर्वेक्षण करून जर प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर असल्यास योग्य त्या उपाययोजना कराव्यात.<br>➢ पिकावर कीटकनाशकाची,बुरशिनाशकाची फवारणी करतांना योग्य ती खबरदारी व काळजी घ्यावी.<br>➢ हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला व हवामानाच्या पूर्वानुमानाकरिता मेघदूत या मोबाइलॲपचा वापर करावा. विजेच्या अंदाजाच्या पूर्वानुमाना करिता दामिनी मोबाइलॲपचा वापर करावा |
| संदेश | | ➢ मेघदूत ॲप डाऊनलोड करण्यासाठी पुढील लिंक वर क्लिक करावे. :https://play.google.com/store/apps/details?id=com.aas.meghdoot |
| रब्बी ज्वारी | दाणे भरण्याची अवस्था | पक्व होत असलेल्या ज्वारी पिकांचे पक्षांपासून संरक्षण करावे.<br>सर्वसाधारणपणे ९० ते १०० दिवस हा काळ कणसामध्ये दाणे भरण्याचा असतो. या अवस्थेत पाणी |

दूरध्वनी –(०२१८९) २३३००१ ईमेल-damu.kvkmohol@gmail.com

| | | |
|---|---|---|
| | | मिळाल्याने कणसात दाणे भरण्यास मदत होते. कणसाचे वजन वाढून उत्पादन वाढते. ज्यांच्याकडे सिंचनाची सुविधा उपलब्ध असेल त्यांनी ज्वारीस पाणी द्यावे.<br>हुरड्या साठी रब्बी ज्वारीच्या फुले मधुर वाणाचे दाणे मऊ व दुग्धावस्थेत असताना कणसाची काढणी करावी व हुरड्यासाठी विक्री करावी. |
| **गहू** | **फुलोरा अवस्था** | गहू पिकास फुलोरा अवस्थेत असताना आणि पेरणीस ६० ते ६५ दिवस झाले असल्यास गरजेनुसार पाणी द्यावे. पिक ५५ ते ७० दिवसाचे असताना १९:१९:१९ या विद्राव्य खताची २% ( १० लिटर पाण्यात २०० ग्रॅम १९:१९:१९ ) या प्रमाणे दोन वेळा फवारणी करावी. |
| **हरभरा** | **फुलोरा ते घाटे भरणे** | हरभराला भरण्याच्या अवस्थेत पाणी मिळाल्याने घाट्या मधील दाणे भरण्यास मदत होते. व उत्पादन वाढते. ज्यांच्याकडे सिंचनाची सुविधा उपलब्ध असेल त्यांनी हरभरा पिकास पाणी द्यावे. हरभरा पिकास तुषार सिंचन पद्धतीने योग्य प्रमाणात पाणी द्यावे. प्रत्येक वेळी पाणी प्रमाणशिर (७ ते ८ सेमी) देणे महत्वाचे असते. जास्त पाणी दिले तर पिक उभळण्याचा धोका असतो.<br>हरभऱ्यावरील घाटे अळीच्या नियंत्रणासाठी क्लोरॅनट्रीनीलीप्रोल १८.५% एस.सी. @ १०० मिली ५०० लिटर पाण्यातून प्रती हेक्टर याप्रमाणे फवारणी करावी.<br>हरभऱ्यावरील घाटेअळीच्या नियंत्रणासाठी पक्षी थांबे उभारावेत व हेक्टरी ५ या प्रमाणे कामगंध सापळे लावावेत.<br>जिरायती हरभरा परिपक्व झाला असल्यास काढणी व मळणी करून घ्यावी. हरभरा उन्हात वाळवून कोरड्या व हवेशीर जागी साठवणूक करावी. |
| **करडई** | **दाणे भरण्याची अवस्था** | करडई पिकावरील मावा किड आढळून आल्यास करडईवरील माव्याच्या प्रभावी नियंत्रणासाठी ७५ एस.पी. ॲसिफेट १६ ग्रॅम प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात पहिली फवारणी पेरणीनंतर ४० ते ४५ दिवसांनी आणि दुसरी फवारणी ५५ ते ६० दिवसांनी स्वछ वातावरणात करावी.<br>करडई पिकात दुसरे पाणी पीक फुलोऱ्यात येताना ५५ ते ६० दिवसांनी द्यावे. |
| **ऊस** | **खोडवा ऊस व्यवस्थापन** | खोडवा ऊस व्यवस्थापन:उसाचे बुडखे मोठे राहिल्यास ते जमिनीलगत धारदार कोयत्याने छाटून घ्यावेत. त्यामुळे जमिनी खालील कोंब फुटण्यास वाव मिळतो व फूटव्यांची एकूण संख्या वाढते. बुडख्यांच्या छाटणी नंतर लगेचच ०.१ टक्के बाविस्टीन ( १ ग्रॅम बाविस्टीन १ लिटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणाची) या बुरशीनाशकाची फवारणी करावी. त्यामुळे मातीतून होणाऱ्या बुरशीजन्य रोगांचा प्रतिबंध होतो.<br>सूक्ष्म अन्नद्रव्य व्यवस्थापन: माती परीक्षणानुसार सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता असल्यास एकरी १० किलो फेरस सल्फेट , ८ किलो झिंक सल्फेट, ४ किलो मँगनिज सल्फेट व २ किलो बोरॅक्सही सूक्ष्म अन्नद्रव्ययुक्त खते १:१० सेंद्रिय खतामध्ये मिसळून ४ ते ५ दिवस सावलीत मुरवून वापरावीत. |
| | **सुरू उस लागवड** | सुरू ऊसाची लागवड १५ डिसेंबर ते १५ फेब्रुवारी दरम्यान करावी.सुरु ऊस लागवड करण्यासाठी को.८६०३२(नीरा), को.एम.०२६५(फुले २६५), एम.एस.१०००१ (फुले १०००१), को.९४०१२(फुले सावित्री), को.सी.६७१(वसंत-१) या जातींची निवड करावी.<br>सुरू उसामध्ये उन्हाळी भुईमूग, कांदा, काकडी, टरबूज, कलिंगड, इत्यादी पिके आंतरपीक म्हणून घेता येतात.<br>बेणे प्रक्रिया:<br>बुरशीजन्य रोग व खवले किड याच्यापासून प्रतिबंधासाठी ऊस बेणे लागणीपूर्वी १० लिटर पाण्यात डायमेथोएट ३०% प्रवाही २६ + मिली ५.१० ग्रॅम कार्बेन्डॅझिम मिसळून १० मिनिटांसाठी बेणे प्रक्रिया करावी.<br>हुमनीचा प्रादुर्भाव असल्यास बीजप्रक्रियेसाठी इमिडक्लोप्रीड प्रती १० लिटर पाणी वापरून बेणे प्रक्रियाकरावी.<br>ॲसेटोबॅक्टर आणि स्फुरद विरघळविणारे जीवाणू संवर्धक अनुक्रमे १०किलो आणि १ १००किलो प्रती २५. लिटरपाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणात उसाच्या टिपऱ्या ३० मिनिटे बुडवून नंतर लागण करावी त्यामुळेनत्रखतामध्ये ५० % २५ची तर स्फुरद खतामध्ये %ची बचत होते.<br>खताची मात्रा : सुरू उसाच्या लागणीच्या वेळी प्रति हेक्टरी २५ किलो नत्र (५५ किलो युरिया), ६० किलो |

# हवामान आधारित कृषि सल्ला

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, जिल्हा कृषि हवामान केंद्र, कृषि विज्ञान केंद्र , मोहोळ , सोलापूर.

दूरध्वनी –(०२१८९) २३३००१ ईमेल-damu.kvkmohol@gmail.com

| | | |
|---|---|---|
| | | स्फुरद (३६५ किलो सिंगल सुपर फास्फेट) आणि ६० किलो पालाश (१०० किलो म्युरेट ऑफ पोटॅश द्यावे.को. ८६०३२ (नीरा) या उसाच्या जातीसाठी २५ टक्के रासायनिक खताची मात्रा जास्त द्यावी. |
| **मका** | **पेरणी** | उन्हाळी मकेची लागवड जानेवारी ते फेब्रुवारी दुसरा आठवडा या दरम्यान करावी.<br>बीजप्रक्रिया: ०२ ते २.५ ग्रॅम थायरम प्रति किलो बियाण्यास पेरणीपूर्वी लावावे. तसेच पेरणीपूर्वी अॅझोटोबॅक्टर वापरावे.<br>टोकणीचे अंतर: ७५ सें.मी. × २० सें.मी.- उशिरा व मध्यम कालावधीच्या वाणाकरिता<br>६० सें.मी. × २० सें.मी.- कमी कालावधीच्या वाणाकरिता<br>खत व्यवस्थापन : पेरणीच्या वेळेस ४० किलो नत्र , ६० किलो स्फुरद द्यावे, ४० किलो पालाश प्रती हेक्टर, पेरणीनंतर ३० दिवसानी ४० किलो नत्र, पेरणीनंतर ४०-४५ दिवसानी ४० किलो नत्र प्रती हेक्टर.<br>सूक्ष्म अन्नद्रव्य : जमिनीत झिंकची कमतरता असल्यास हेक्टरी २० ते २५ किलो झिंक सल्फेट द्यावे. |
| **कलिंगड** | | कलिंगड, खरबूज पिकामध्ये रोपवाढीच्या प्राथमिक अवस्थेत ‘क्रॉप कव्हर’ (नॉन वूव्हन फॅब्रीक) तंत्राचा वापर २१ ते २५ दिवस करावा. याच्या वापरामुळे पिकाच्या वाढीसाठी आणि विकासासाठी आवश्यक सूक्ष्म वातावरणाची निर्मिती होते. पिकाची जोमदार वाढ होऊन उत्पादनाचा दर्जा सुधारतो. तुलनेत पीक लवकर तयार होते. क्रॉप कव्हर हे पिकाचे धुके, थंडी, ऊन, गारा, अवकाळी पाऊस यांपासून संरक्षण करते. वाढीच्या सुरुवातीच्या अवस्थेमध्ये रोगजंतू, किडींना अटकाव होतो. यामुळे पीक संरक्षण खर्चात व कष्टात बचत होते. पिकाच्या एकूण कालावधीमध्ये पीक संरक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या फवारण्यांची संख्या कमी लागते. |
| **डाळिंब** | **वाढीची अवस्था** | डाळिंब फळपिकावर मावा, फुलकिडे, पांढरी माशी व फळे पोखरणारी आळी यांचा प्रादुर्भाव झाल्यास नियंत्रणासाठी सायनाट्रिनीलप्रोल १०.२६% ओ.डी. ७ ते ९ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **द्राक्ष** | **मणी वाढीची अवस्था** | हवेमध्ये जास्त आद्रता असल्याने भुरी रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. प्रादुर्भाव झाल्यास नियंत्रणासाठी अमपेलोमायसेस क्विसक्वालीस @ ५ ग्रॅम प्रती लिटर पाणी याप्रमाणात फवारणी करावी. |
| **केळी** | | केळी पिकावरील फुलकिडीच्या नियंत्रणासाठी केळीचे घड ६ टक्के सच्छीद्रतेच्या पॉलीथीन पिशव्यांनी झाकावेत. मावा किडीच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट २० मिली प्रती १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. केळी बागेत काकडी, भोपळा, कलिंगड, खरबूज तसेच मिरची, वांगी यासारखी पिके घेणे कटाक्षाने टाळावे. |
| **जनावरांचे व्यवस्थापन** | | उन्हाळी हंगामात जनावरांना हिरवा ओला चारा उपलब्ध व्हावा म्हणून पाणी उपलब्धतेनुसार ज्वारी किंवा बाजरी किंवा मका या चारा पिकांची लागवड करावी. शेळ्या करिता लिव्हर फ्लूक (चपटे कृमि) जंतांच्या नियंत्रणासाठी पशूवैद्यकाच्या सहहयाने जंतनाशक पाजावे. जनावरांना नेहमी स्वच्छ पाणी पिण्यास द्यावे. उसाचे वाढे जनावरांना जास्त प्रमाणात खाऊ घालू नये. खाऊ घालायचे असल्यास प्रती दिवस एका जनावरास केवळ ८ किलो वाढे आणि त्यासोबत सकस द्वीदल वर्गातील हिरवा चारा, गरजेनुसार वाळलेला चारा व आंबावण तसेच २५ ते ३० ग्रॅम क्षार मिश्रण देणे अत्यंत गरजेचे आहे. |

**स्त्रोत :**
**१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.**
**२) मागील हवामान :विभागीय कृषि संशोधन केंद्र, सोलापूर.**

**ठिकाण :कृषि विज्ञान केंद्र, मोहोळ, सोलापूर.**
**दिनांक : ०३ फेब्रुवारी २०२३**

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्रामीण कृषि मौसम सेवा-जिल्हा कृषि हवामान केंद्र, कृषि विज्ञान केंद्र, मोहोळ, सोलापूर.**